# कमला कॉलेजतर्फे धबधबेवाडी येथे जनसाक्षरता दिन

कोल्हापूर■

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने पन्हाळा तालुक्यातील मौजे धबधबेवाडी येथे जनसाक्षरता दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

गावातील मुलींसाठी महापुरूषांचे शैक्षणिक कार्य या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या मध्ये पुजा रामचंद्र सासवडे हिने प्रथम, प्रसाद शामराव पाटील हिने द्वितीय तर श्वेता संजय पवार हिने तृतीय क्रमांक पटकाविला. मुलांनी महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, धोंडो केशव कर्वे, आनंदीबाई जोशी यांच्या कार्याचा आढावा घेतला. प्राचार्य डॉ.क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. एन. एस.शिरोळकर, प्रा.ए.ए.घस्ते, सरपंच भिकाजी खोपकर, मुख्याध्यापक व्ही.बी.आयरेकर यांचे सहकार्य लाभले.

तरुण भारत १३ सप्टे ०६